महासागर

गुरूवार, दि. 13 मार्च 2025

अमरावती

पान 3

जंगलातील वृक्ष तोडाल तर खबरदार!

होळीच्या पर्वावर वनविभाग 'अलर्ट' ● जंगलात वृक्ष तोडताना दिसल्यास होईल कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 12) होळी म्हटली की, लाकडे रचून ते दहन करण्याची प्रथा आहे. परंतु होळीसाठी अनेक जण हिरव्यागार वृक्षांची कत्तल करून, ती लाकडे होळीत दहन करतात. त्यामुळे या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. विशेष म्हणजे अनेक जण शहरालगतच्या जंगलात जाऊन वृक्ष तोडतात. त्यामुळे या वृक्षतोडीचा परिणाम वन्यप्राण्यांच्या संवर्धनावर होऊ शकतो. त्यामुळे होळीनिमीत्त वनविभाग आता अलर्ट झाला असून, होळीसाठी जर वनातील लाकूड तोडाल तर खबरदार असा इशाराच वनविभागाने दिला आहे.

होळी सणानिमित्त लाकूड गोळा करण्यासाठी अनेक जण मोठमोठी वृक्ष तोडतात. अमरावती जिल्ह्यासह शहरातील अंतर्गत भागातही अनेक जण वृक्ष तोडून लाकूड गोळा करतात. अशा स्थितीत हिरवीगार वृक्षांचीही कत्तल मोठ्या प्रमाणात केली जाते. परंतु या वृक्षतोडीला आळा बसविणे आता गरजेचे झाले आहे. अनेक नागरिक वृक्ष तोडीसाठी जंगलात प्रवेश करतात. परंतु होळी सणाच्या अनुषंगाने वनविभागाने जंगलातील हालचालींवर लक्ष केंद्रित केले आहे. जर जंगलातील लाकूड तोडण्यासाठी गेल्यास त्यांना वनविभागाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

होळी पर्यावरणपूरक साजरी करा !

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षतोड थांबायला हवी. पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी वृक्षाचे महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यास प्राधान्य द्यावे. रंगपंचमीदेखील साजरी करताना केमीकलयुक्त रंगाचा वापर करू नका, नैसर्गिक रंगाचा वापर करून पर्यावरणपूरक होळी व रंगपंचमी साजरी करा.

नीलेश कंचनपूरे, अध्यक्ष, वॉर संस्था

800 पोलीस अधिकारी -कर्मचारी राहणार तैनात

शहर पोलिस आयुक्तालयातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत होळी आणि रंगपंचमीनिमित्त पोलिस विभागाकडून कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गुरूवारी (दि.13) होळी आणि शुक्रवारी(दि.14) रंगपंचमी सर्वत्र साजरी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर 750 हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तात तैनात असतील. पोलिस कर्मचारी मुख्य चौकात उभे राहून हुल्लडबाजी करणार्यांवर करडी नजर ठेवतील. या बंदोबस्तात 700 पोलिस कर्मचारी, 50 एपीआय, 5 एसीपी आणि 2 डीसीपी यांच्यासह होमगार्ड आणि एसआरपीएफ टीमचा समावेश असेल. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले असून पोलीस संरक्षणात होळीचा सण साजरा करण्यात येणार आहे. यंदाही महिला सुरक्षेला प्राधान्य देत महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथक तैनात करण्यात येणार आहे. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस आयुक्तालयातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

शिकारी, वृक्षतोडीवर वनविभागाचे लक्ष

होळी सणानिमीत्त नागरिक जंगलात शिरून वृक्षतोड करू शकतात. अशाप्रसंगी वन्यप्राण्याच्या शिकारी होण्याची शक्यता असते. यासाठी वनविभाग सतर्क आहे. जर कुणीही जंगलात जाऊन वृक्षतोड करताना दिसेल, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. वृक्षतोडीचे जागतिक तापमानावर मोठे दुष्परिणाम होतात. त्यामुळे वृक्ष संवर्धन, लागवड व जोपासन करण्याची गरज आहे. या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकार्यांना गाईडलाईन्स देण्यात आली आहे. खबरदारी घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. नागरिकांनीही जंगलात जाऊन वृक्षतोड करू नये, पाला-पाचोळा, कचरा जाऊन होळी सण साजरा करावा असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

480 ठिकाणी सार्वजनिक होलिका दहन

शहर पोलिस आयुक्तालय परिसरात 480 ठिकाणी सार्वजनिक होळी पेटविण्यात येणार आहे. तसेच 1766 ठिकाणी खाजगी होलिका दहन होणार आहे. शहरात अनेक ठिकाणी होळी साजरी केली जाते. शंकर नगर, राजापेठ, पंचवटी चौक, गाडगेनगरसह शहरातील विविध परिसरात सामूहिक होलिका दहन होणार आहे.

पर्यावरणपरक होळीला प्राधान्य

होळी सणानिमित्त वृक्षतोड करू नका, असे आवाहन वन्यप्रेमींसह वनविभागाकडून करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक होळी साजरी करून, निसर्ग संवर्धनास प्राधान्य द्या, असे आवाहनदेखील वन्यजीवप्रेमींनी केले आहे. वन्यप्रेमींकडून पर्यावरणपुरक होळीसंदर्भात जनजागृती सुरू आहे. त्यामुळे अनेक जण पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यास प्राधान्य देत आहे. अनेक जण तर कचर्याची होळी करून शहर स्वच्छतेचा संदेशदेखील देत आहे.

दुचाकी चालकांची होणार तपासणी

रंगपंचमीच्या दिवशी दारू पिऊन गाडी चालवणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. दारू पिऊन गाडी चालवताना आढळून आल्यास कारवाई केली जाईल. तसेच ट्रिपल सीट चालकांवर पोलिसांची नजर राहणार आहे.

मोगरा शेतशिवारात हरभऱ्याच्या गंजीला आग

तळेगाव दशासर पोलीसांत दोघांविरूध्द गुन्हा दाखल

एक लाखांचे नुकसान

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे,(दि.12)- चांदूर रेल्वे तालुक्यातील व तळेगाव दशासर पोलीस स्टेशन अंतर्गत येर्णाया मोगरा शेतशिवारात हरर्भ्याच्या गंजीला आग लागून शेतर्कयाचे एक लाखांचे नुकसान झाल्याची घटना 10 मार्च रोजी रात्री 11.30 वाजताच्या दरम्यान घडली असुन याप्रकरणी दोन आरोपींविरूध्द 11 मार्चला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी मनोहर शंकरराव बन्सोड यांच्याकडे मोगरा शेतशिवारात 10 एकर शेती असुन त्यापैकी अडीच एकर हरभरा पिक पेरले होते. पाच - सहा दिवसापुर्वी चना पिक सोंगुन शेतातच गंजी मारून ठेवले होते. अशातच 10 मार्च रोजी रात्री 11.30 वाजताच्या दरम्यान घरातील लाईट गेल्यामुळे फिर्यादीचा लहान मुलगा निलेश मनोहर बन्सोड हा लाईट का गेली पाहण्याकरिता उठला असता त्याला शेतामध्ये मोठी आग दिसली. तर त्याने मोठा भाऊ पंकज मनोहर बन्सोड याला आवाज देवुन उठवले. यानंतर दोघांनीही शेतात जावुन पाहिले तर हरर्भ्याच्या गंजीला आग लागल्याचे दिसले. दोघांनीही आग विझविण्याचा प्रयत्न केला, परंतु लाईट नसल्यामुळे ते आग विझवु शकले नाही. तसेच अग्निशमन दलाचे वाहन येईपर्यंत हरर्भ्याची गंजी जळून खाक झाली होती. त्यांच्या शेताजवळून जाण्या - येण्याचा रस्ता असुन गंजीला आग लागली होती तेव्हा तेथून भीमराव सुभाष ढेकले (वय 30 वर्ष) व रामसिंग श्यामसिंग कचवे (वय 40 वर्ष) हे दोघे जातांना निलेश मनोहर बन्सोड़ याला दिसले. त्यामुळे या दोघांनीच माझे शेतातील हरर्भ्याची गंजी जुन्या वादातुन पेटवून माझे 1 लाख रूपयाचे रूपयाचे नुकसान केल्याची तक्रार फिर्यादी मनोहर बन्सोड यांनी तळेगाव पोलीसांत दिली. यावरून पोलीसांनी भीमराव सुभाष ढेकले व रामसिंग श्यामसिंग कचवे, दोन्ही रा. मोगरा यांच्याविरुध्द बीएनएस कलम 326 (एफ) व 3 (5) अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहे.

एडीजींनी घेतला शहरातील गुन्ह्यांचा आढावा

नवीन कायद्याबाबत केले मार्गदर्शन

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.12) - पोलीस आयुक्तालय येथील वार्षिक निरीक्षणादरम्यान 12 मार्च रोजी अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी शहरातील गुन्ह्यांचा आढावा घेत पोलिस अधिकार्यांना नवीन कायद्याबाबत मार्गदर्शन केले.

पोलीस आयुक्त कार्यालयात सर्व वरिष्ठ अधिकारी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची गुन्हेविषयक बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच मागील तीन वर्षातील आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यांचा व कामकाजाचा आढावा घेतला. शोध न लागलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा त्वरित शोध घेऊन गुन्ह्यांची निर्गती करण्याबाबत सूचित केले. यावेळी अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी आयुक्तालय हद्दीतील सर्व वरिष्ठ अधिकारी, सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या वैयक्तिकरित्या मुलाखती घेऊन कामकाजाचा व उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. त्यांच्या अडचणींबाबत विचारणा करून त्या सोडवण्यासंदर्भात प्रयत्न करण्याचे आश्वासन यांनी यावेळी दिले. याप्रसंगी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस स्टेशनचे व शाखेचे प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी, अंमलदार, उपस्थित होते.

इर्विनच्या एक्सरे विभागातून मंगळसूत्र चोरणाऱ्या महिलेला अटक

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 12) - जिल्हा सामान्य रुग्णालयातील एक्सरे विभागातून मंगळसूत्र चोरी करणार्या एका महिला आरोपीला गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने 12 मार्च रोजी अटक केली. पोलिसांनी महिला आरोपीच्या ताब्यातून 6.5 ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र व एक मोबाईल हॅण्डसेट असा एकूण 52 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला पुढील तपासकामी जप्त मुद्देमालासह सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिस सुत्रानुसार, 13 फेब्रुवारी रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयातील एक्सरे विभागातून आशा सुभाष क्षिरसागर (रा. मोठा हनुमान नगर, अमरावती) यांचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोराने लंपास केले होते. या घटनेची तक्रार आशा क्षिरसागर यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम 305 (अ) अन्वये गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पोलिसांनी तांत्रिक पध्दतीने तपास करून गुन्हा उघड केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउद्दीन खतीब, पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशोर खेंगरे यांनी केली आहे.

तरुणाची गळफास लावून आत्महत्या

अमरावती- राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अंबाविहार परिसरात एका तरुणाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. योगेश पातुरकर (30, रा. अंबाविहार) असे मृताचे नाव आहे. त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिस चौकशी करीत आहेत. सुमन ज्ञानेश्वर पातुरकर (60, रा. अंबाविहार) यांनी राजापेठ पोलिसांना माहिती दिली की, त्यांचा मुलगा योगेश ज्ञानेश्वार पातुरकर याने पंख्याला दुप्पटा बांधून गळफास घेतला. तसेच त्यांनी त्याला खाली उतरून तत्काळ रुग्णालयात नेले आणि या घटनेची माहिती पोलिसांना दिली. डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. या घटनेनंतर पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात नेला. याप्रकरणात पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

वीज चोरीचे दोन गुन्हे दाखल

अमरावती - मिटरमध्ये छेडछाड करून वीज चोरी करणार्या दोन जणांविरुध्द बडनेरा पोलिस ठाण्यात 11 मार्च रोजी गुन्हे नोंदविण्यात आले. गुलाम शहजाद गुलाम रसूल (रा. पुंडलिकबाबा नगर, टॉवर लाईन, कठोरा रोड, अमरावती) व राझिक खान रशिद खान (35, रा. पॅराडाईज कॉलनीजवळ, राममोहननगर, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत.

शंभर दिवसाच्या कृती आराखड्याची सर्व कार्यालयांनी अंमलबजावणी करावी

विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.12)- राज्य शासनाने शंभर दिवसासांठी सात कलमी कृती आराखडा निश्चित केला असून अमरावती विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी असे निर्देश अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी दिले.

विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, महानगर पालिका आयुक्त, आणि सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांची दूरदृश्य प्रणालीमार्फत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सर्व संबंधित विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रत्येक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 10 ते 15 दिवस लक्ष देऊन काम केल्यास कृती आराखड्यातील सर्व बाबींची उत्कृष्ट अंमलबजावणी होऊ शकते. यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे असे सांगून आयुक्त सिंघल म्हणाल्या की, सर्व कार्यालयांच्या इमारतीत साफसफाई, स्वच्छता आणि सुविधांवर भर देण्याची गरज आहे. पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था चोख असली पाहिजे. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनस्त कार्यालयात ह्या सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्याची खातरजमा करावी व कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा सातत्याने आढावा घ्यावा असेही त्या म्हणाल्या. नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करतांनाच कार्यालयातील आस्थापना विषयक बाबींची पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी असे सांगून आयुक्त सिंघल यांनी 'आयजीओटी' या ॲपवर नोंदणी करून प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन केले. ई ऑफिस प्रणालीच्या वापराचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

7 मुद्दयांवर कार्यवाही करण्याचे अपेक्षित

क्षेत्रीय कार्यालयाच्या कृती आराखड्यातील कामांचा आढावा घेऊन विभागीय आयुक्त सिंघल पुढे म्हणाल्या की, राज्य शासनाने प्रशासनिक विभागासाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा निश्चित केला असून त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता 7 मुद्यावर प्रभावी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यामध्ये 1) संकेतस्थळ 2) सुकर जीवनमान 3) स्वच्छता 4) जनतेच्या तक्रारीचे निवारण 5) कार्यालयातील सोयी सुविधा 6) गुंतवणूक प्रसार आणि 7) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी याचा समावेश आहे. सर्व विभागाच्या कार्यालयांना या मुद्यावर कार्यवाही करून 15 एप्रिल पर्यंत अहवाल सादर करायचा आहे. अशा कार्यवाहीची पाहणी करण्यात येऊन पुरस्कार देण्याची योजना आहे.

ग्रामपंचायत कार्यालय येरला, ता. मोर्शी जि. अमरावती

जाहीर निविदा मागणी

ग्रामपंचायत येरला ता.मोर्शी,जि.अमरावती येथील सन २०२४-२०२५ मधील १५ वा वित्त आयोग अंतर्गत करावयाची विकास कामे करीता सर्वत्र नोंदीकृत,पंजीकृत कंत्राटदार /गुत्तेदार तसेच साहित्य पुरवठादार यांच्या कडून पुढील दर्शविलेल्या कामासाठी/साहित्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे.करीता इच्छुक नोंदीकृत,पंजीकृत कंत्राटदार /गुत्तेदार तसेच साहित्य पुरवठादार यांनी त्यांच्या सीलबंद लिफाफा मध्ये दिनांक १७/०३/२०२५ ते २४.०३.२०२५ या कालावधीत , सायंकाळी ५.०० वा.पर्यंत निविदा सादर कराव्यात (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी)

अ. क्र.	कामाचे नाव	कामाची किंमत /रक्कम	निविदा स्वीकारण्याची /निविदा विक्रीची किंमत	कामाचा बयाना/सुरक्षा ठेव रक्कम	शासकीय पंजीकृत /नोंदणी वर्ग
०१	बंधिस्त नाली बांधकाम गजानन मध्यतकार ते पदमाकर बोनखडे	३००००० /-	५००/-	३०००/-	वर्ग ७ व त्या वरील
०२	शौचालय व स्नानगृह नंदकिशोर महाराज देवस्थान येरला	१८८२३५/-	३००/-	१८८५/-	वर्ग ७ व त्या वरील
०३	सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम रुखमाबाई बोरकुटे ते सहदेव दामोधर	२७५०००/-	५००/-	२७५०/-	वर्ग ७ व त्या वरील
०४	कॉंक्रीट नाली बांधकाम करणे प्रदीप खंडारे ते बनखात्याची जमीन पर्यंत.	२७५०००/-	५००/-	२७५०/-	वर्ग ७ व त्या वरील
०५	जि. पं. शाळा येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे	१२२५००/-	३००/-	१२२५/-	वर्ग ७ व त्या वरील
०६	पाणी पुरवठा पाईप लाईन व पा. पु. साहित्य खरेदी करणे	२८८२३०/-	५००/-	२८८५/-	वर्ग ७ व त्या वरील

अटी व शर्ती

1.निविदा सादर करणे विषयक चा तपशील हा ग्रामपंचायत येरला येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल

2.निविदा सीलबंद नसल्यास नाकारण्यात येईल

3.कामाच्या निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार सरपंच,सचिव यांनी राखून ठेवले आहेत म्हणजेच ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत

४.कामाच्या सुरक्षा ठेवीचा धनाकर्ष हा लिफाफा क्रमांक ०१ मध्ये सादर करावा

५.शासन स्तरावरून देयके प्राप्त झाल्यावरच संबंधित कंत्राटदार /गुत्तेदार तसेच साहित्य पुरवठादार यांना अदा करण्यात येईल

६.निविदा विक्री हि दिनांक १७.०३.२०२५ पासून ग्रामपंचायत येरला येथे कार्यालयीन वेळेत चालू राहील

७.निविदा ह्या द्वी(दोन) लिफाफा पद्धतीने सादर कराव्यात

८.कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच पुरवठा करावयाचे साहित्य हे नामांकित कंपनीचे राहील याची दक्षता घ्यावी लागेल

९.सीलबंद निविदा ह्या दिनांक २४.०३.२०२५ नंतरच्या होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत उघडण्यात येईल

सचिव/सरपंच
ग्रामपंचायत येरला
ता. मोर्शी, जि. अमरावती

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

कायद्याचा वचक राहण्यासाठी चुरणी पोलीस स्टेशन आवश्यक

आंतरराज्यीय सिमेवरील अवैध व्यवसाय व आदीवासींची फरपट थांबेल

मारोती पाटणकर

चुरणी,(दि.12) - स्वतंत्र काळापासून चुरणी हतरू, भांडुम, खडीमल, चुनखडी हा भाग मागासलेला आहे. या भागातील आदिवासी बांधवांना न्याय हक्कासाठी नेहमी संघर्ष करावा लागतो. आदिवासी गोरगरीब जनतेला पोलीस स्टेशन दूर असल्याकारणाने न्याय मिळत नाही. त्यामुळे या भागातील अनेक आदिवासी बांधव दबावाखाली जीवन जगत असतात अनेक आदिवासी बांधवांना अनेक वर्ष न्याय साठी लढावे लागते. चिखलदरा येण्यासाठी चिखलदरा पोलीस स्टेशनच्या चकरा माराव्या लागतात.

या भागातून चिखलदरा दीडशे ते दोनशे किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या भागातील आदिवासी बांधवांची अर्धी शक्ती चकरा मारण्यातच जाते व या ठिकाणी न्याय मिळेल याची शाश्वती नसते. त्यामुळे आदिवासी बांधवांची फरपट थांबत नाही. या भागात पोलीसांची भिती जरी असली तरी कायद्याचे ज्ञान नाही. त्यामूळे त्यांच्यात कायद्याचे वचकही नाही. चुरणी येथे पोलीस स्टेशन झाल्यास आंतरराज्यीय सिमेवरील अवैध व्यवसाय व आदीवासींची फरपट थांबेल.

सिमांत भागात अवैध व्यवसाय

या भागातील खेड्यांपासून मध्यप्रदेश अतिशय जवळ आहे. मध्यप्रदेश ची सीमा लागून असल्याने या भागात मोठ्या प्रमाणात अवैध दारू मोठ्या प्रमाणात खुलेआम विक्री होते. त्यामुळे या भागातील युवा वर्ग दारूच्या आहारी जात आहे. अख्खी पिढी बर्बाद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे या ठिकाणी पोलीस स्टेशन झाले तर या भागात पोलिसांचा दबाव राहील, तसेच कायदा व सुव्यवस्था नांदेल. त्यामुळे चुरणी येथे पोलीस स्टेशन व्हावे याची सामान्य जनतेची मागणी आहे.

"चुरणी हे ठिकाण चिखलदरा पासुन 65 किलोमिटर असुन ते शेवटे गाव भाडुंम वरुन अंदाजे 120 किलोमीटर असुन चिखलदरा पोलीस स्टेशन लांब आहे व मध्यप्रदेशची सीमा लागुन आहे. या भागात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात आहे व सध्या गोवंश तस्करी मोठ्या प्रमाणात सुरु आहे. या सर्वांवर आवर घालण्यासाठी चुरणी या ठिकाणी पोलीस स्टेशन होणे खूप आवश्यक आहे.

रुपेश भक्ते
भाजप कार्यकर्ते चुरणी

"तालुक्याची भौगोलिक व्याप्ती बघता चुरणी किंवा काटकुंभ ला पोलीस स्टेशन होने कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक आहे. वेळेत पोलीस मदत मिळवण्यासाठी सोय होईल. तशी मागणी या आधीही जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

पियुष मालवीय,
युवक काँग्रेस अध्यक्ष मेळघाट विधानसभा.

शिक्षक संच मान्यतेच्या निर्णयाविरोधात 17 ला धरणे

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार निदर्शने

महासागर प्रतिनिधी
अमरावती,(दि.12) - राज्यातील शाळांमधील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क डावलणारा शिक्षक संचमान्यतेचा निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप करून, हा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने 17 मार्च रोजी संपूर्ण राज्यात धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात येणार आहे. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुद्धा प्राथमिक शिक्षक आंदोलन करतील 15 मार्च 2024 रोजी संच मान्यता अंतिम करण्यात आली आहे. शिक्षण कायद्यातील तरतुदीच्या व 28 ऑगस्ट 2015 च्या निर्णयाशी विसंगत असा हा निर्णय आहे. या निर्णयामुळे अनेक शाळांमध्ये शिक्षकच राहणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. राज्यातील हजारो शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या असून गुणवत्तापूर्ण शिक्षणात हा निर्णय अडसर ठरणार असल्याचा आरोप प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केला आहे. शिक्षकांअभावी अनेक गावांमधील शाळा बंद होऊन पालकांना इतर गावातील शाळांमध्ये आपल्या पाल्यांना दाखल करावे लागेल. शिक्षणासाठी मुला-मुलींची परवड होऊन त्यांची सुरक्षितता ही संकटात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी गळतीचे प्रमाणही वाढेल, असे कोंबे यांनी म्हटले आहे.

शिक्षक संच मान्यतेच्या निर्णयाला राज्यभरातून शिक्षकांकडून प्रखर विरोध होत आहे. हा निर्णय रद्द करण्याची मागणी जोर धरत असली तरी शासनाकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने 17 मार्च रोजी संपूर्ण राज्यात धरणे आंदोलन करून सरकार विरोधात शिक्षक निदर्शने करणार आहेत. या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, सरचिटणीस राजन कोरगावकर, उदय शिंदे, गोकुळदास राऊत, संभाजी रेवाळे, राजेश सावरकर, रवीना कोल्हे, अजयानंद पवार, शैलेंद्र दहातोंडे, प्रशांत निमकर, नंदकिशोर पाटील, सरिता काठोळे, विनिता घोलप, सुषमा वानखडे, भावना ठाकरे, मनीष काळे, गोविंद मुंडे, गजानन दातीर, दत्तात्रय रहाटे, अल्हाद तराळ, प्रेमसुख ठोंबरे, निलेश कांडलकर, पंकज दहिकर, नितीन देशमुख, अजयानंद पवार, मनीष येवले, उमेश चुनकीकर, संजय शेलोकार, रत्नाकर पडोळे, रामदास भाग्यवंत, विनोद पाल, योगीराज मोहोळ, राजेश ठाकरे, छगन चौधरी, सुनील बोकाडे, जगदीश वानखडे, तुळशीराम धांडे, चंद्रकांत कुरळकर, विजय सरोदे, विलास चौखंडे, संतोष राऊत, धनंजय डांगे, शामकांत तडस, प्रमोद ढाकूरकर, प्रफुल्ल शेंडे, विवेक ठाकरे, नंदकिशोर रायबोले, किशोर वैराळे, गजानन कावलकर, राहुल वानखडे, विजय खोडसकर, लता टेंबरे, सरिता दाडगे, नम्रता लाडोले, विनिता भुलक्षी आदींनी केले आहे.

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना चार पारितोषिके

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 12) - सीओईपी पुणे च्या भाऊ फौंडेशनतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील 'इग्रेटर इनव्होटर ऑफ इंडिया' या स्पर्धेत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी (दि.10) उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत एक प्रथम आणि दोन द्वितीय आणि एक बेस्ट महाविद्यालय असे एकूण चार पारितोषिके पटकावत महाविद्यालयाने महाराष्ट्रातील सर्वोत्तम प्रदर्शन करणाऱ्या संस्थांमध्ये आपले नाव कोरले आहे.

पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, टेकनॉलॉजिकल विद्यापीठ पुणे, भाऊ फाऊंडेशनच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते.ही राष्ट्रीय स्तरावरील प्रोजेक्ट स्पर्धा पाच टप्प्यांत घेतली जाते, ज्यामध्ये प्रत्येक फेरी एलिमिनेशन राउंड असते. संपूर्ण महाराष्ट्रभरातून जवळपास 90 अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. 6 व 7 मार्च 2025 रोजी पुण्यातील सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये झालेल्या अंतिम फेरीत पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाच्या 17 चमूंनी राज्यातील टॉप 40 संकल्पनांमध्ये स्थान मिळवले आणि त्यापैकी चार चमूंनी पारितोषिके पटकावली.

स्पर्धेतील उद्योजक क्षेत्रामध्ये 2 पारितोषिके सीएसई आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन विभागाचे हिमांशू अलोन (प्रथम) आणि चम्मू आणि श्रुतिका पांडे (द्वितीय) आणि तसेच शिक्षण क्षेत्रात 1 पारितोषिक मेकॅनिकल विभाग मधील राज पाथरे आणि चमूने मिळविले. याशिवाय, महाराष्ट्रातील सर्वोत्तम प्रदर्शन करणारे महाविद्यालय म्हणून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाला 'बेस्ट फिलान्थ्रॉपीस्ट अवॉर्ड' देण्यात आला.

या संपूर्ण स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रभारी प्रा. अक्षय पुंडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर प्रा. स्नेहा सोनटक्के यांनी सहकार्य केले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष , उपाध्यक्ष , संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधीया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बाबासाहेबांना अपेक्षित धम्म गतीमान करा

भिख्खू संघाची धम्मदेसना

काकडा येथे तीन दिवसीय धम्म परिषद संपन्न

महासागर प्रतिनिधी
परतवाडा (दि. 12) - तालुक्यातील काकडा विश्वशांती बुद्ध विहार येथे तीन दिवसीय धम्म परिषद 8 मार्च 10 मार्च दरम्यान नागपूर, श्रीलंका, अमरावती, थायलंड येथील भिख्खू संघाच्या व हजारो धम्म उपासिका, उपासकांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी भिख्खू संघाची धम्मदेसना देण्यात आली. भगवान बुध्दांनी दिलेला जनकल्याणाचा मार्ग व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या धम्म जनमानसात रुजवा अशी धम्मदेसना भिख्खू संघाने यावेळी केली. काकडा येथे तिन दिवस नियोजनबद्ध धम्म परिषद संपन्न झाली. विश्वशांती बुद्ध विहार बांधण्यासाठी राजू बोंडे गुरुजी यांनी दोन एकर जमीन दान दिली. फार मोठे अनमोल कार्य त्याच्या हातून घडल्याचा मत यावेळी व्यक्त करण्यात आले. काकडा या ठिकाणी सुनील सदाशिव यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत 10 कलमी कार्यक्रमानुसार कार्य होईल असे मत विश्वशांती बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष सुनील सदाशिव यांनी व्यक्त केले. दि. 9 मार्चच्या रात्री धम्म चर्चेत धम्म उपासक सहभागी झाले होते. दि.8 व 9 मार्च च्या रात्री भव्य बुद्ध भीम गीताच्या बहारदार कार्यक्रम पार पडला. या धम्म परिषद मध्ये दि.8 मार्च ला त्यागमुर्ती माता रमाईचे योगदान, जीवन सुचिता, बौद्ध धर्मातील स्त्रियांचे स्थान, व दि.9 मार्च ला बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला धम्म,बौद्ध धर्मातील सम्यक समाधीचे महत्त्व, प्रतित समुपाद(कार्यकारणभाव) सिध्दांत यावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच दि.10 मार्च ला चार आर्यसत्य व अष्टांगिक मार्ग, संविधान साक्षरता, बेरोजगारी व उपाय, सामाजिक आर्थिक विकास व समाजाची स्थिती, या विषयावर मुद्देसुद मार्गदर्शन लाभले.

दि.8 मार्च ला सुप्रसिद्ध गायक किशोर सरदार व वैशाली रायबोले, आशा मेश्राम व संच अमरावती यांचा चांदणे निळ्या नभाचे बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. दरम्यान काकडा येथील विश्वशांती बुद्ध विहाराचे बांधकाम सुरू असून अनेक श्रध्दावान उपासक व उपासिकांनी मोठ्या प्रमाणात धम्मदान दिले. यावेळी धम्म कार्यात उलेखनीय काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.ही धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी विश्वशांती बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व सदस्यांनी व धम्म उपासकांनी अथक परिश्रम घेतले.

नि:शुल्क महाआरोग्य व रोगनिदान शिबीर

डीगरगव्हान येथे संत श्री दामोदर महाराज प्रगट दीनानिमित्य आयोजन

महासागर प्रतिनिधी
तिवसा (दि. 12) - तिवसा तालुक्यातील डीगरगव्हान येथे 8 मार्च रोजी श्री संत दामोदर महाराज यांचा 82 वा प्रगटदिन महोत्सव उत्साहात पार पडला. यानिमित्ताने भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हिम्मत फाऊंडेशन, स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर व जीवन आधार बहुद्देशीय संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य खात्यामध्ये अविरत सेवा देणाऱ्या महिला डॉक्टरांचा रविराज देशमुख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. व त्यांना महिला दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. आरोग्य सेवेच्या माध्यमातून लाखो रुग्णांच्या सेवेसाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रविराज देशमुख यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी सचिन इंगळे (पश्चिम विदर्भ प्रमुख ओबीसी मोर्चा), श्यामभाऊ नारखेडकर, उमेशभाऊ श्रीखंडे, दीपक वाडीभस्मे, विजय महाराज, तसेच स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर येथील सर्व महिला डॉक्टर व भाविक भक्त उपस्थित होते. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी अशा स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी व त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोदींजींच्या नेतृत्वात केंद्र व राज्य सरकार सदैव तत्पर आहे. केंद्र व राज्य सरकार महिलांच्या सन्मानासाठी कटिबद्ध असून महिलांसाठी विविध योजना राबवित आहे. असे प्रतिपादन रविराज देशमुख यांनी यावेळी केले.

शासकीय तुर खरेदीचा शुभारंभ

महासागर प्रतिनिधी
अचलपूर (दि. 12). अचलपूर सह. खरेदी विक्री संस्था मर्या. मार्फत रविवारी (दि.9) मार्च रोजी सकाळी 10 वा. शासकीय तुर खरेदीचा (नाफेड) शुभारंभ आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला ख.वि.संस्थेचे अध्यक्ष बंडू ठाकरे,उपाध्यक्ष जसवंत तरवले आणि संचालक मंडळ तसेच अचलपूर कृ.ऊ.बा. समिती चे सभापती प्रतिभा ठाकरे,उपसभापती अमोल चिमोटे,संचालक पोपट घोडेराव, सुधीर रहाटे,भाजपा चे विशाल काकड आणि संचालक मंडळ, अधिकारी वर्ग तसेच तालुक्यातील शेतकरी बांधव उपस्थितीत होते.यावेळी उपस्थितीत मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच शेतकरी बांधवांचा सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

स्त्रियांना कायद्याचे ज्ञान आवश्यक - दिप्ती ब्राम्हणे

विद्यापीठात राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 12)- इंग्रजकालीन कायद्यांमध्ये असणारे दोष दूर करून समाजहितासाठी व महिलांच्या सक्षमीकरणासाठी आमुलाग्र बदल कायद्यात झाले असून ते जाणून घेतल्याशिवाय स्त्रिया सक्षम होऊ शकणार नाही, कायद्याची जाणीव व ज्ञान सर्वांना मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन भरोसा महिला सेलच्या पोलीस निरिक्षक दिप्ती ब्राम्हणे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत (दि.11) जागतिक महिला दिनानिमित्य एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यापीठ विद्या परिषद सदस्य डॉ. जयश्री धोटे व सुप्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन मालोकार उपस्थित होते.

दिप्ती ब्राम्हणे पुढे म्हणाल्या, विविध ठिकाणी काम करतांना महिलांना बऱ्याचदा पुरूषी मानसिकतेचा त्रास होतो. आजही सरकारी क्षेत्र असो किंवा खाजगी क्षेत्र बऱ्याचदा या समानतेच्या काळातही अनेक आव्हाने महिलांसमोर आहेत. याप्रसंगी त्यांनी स्त्रियांवर होणारे अत्याचार तसेच पोस्को कायदा, पॉश कायदा, विशाखा समिती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी डॉ. जयश्री धोटे म्हणाल्या, स्त्रियांनी स्वतःबद्दल जागृती करून स्वतःच मार्गदर्शक बनावे व खंबीरपणे जीवनात येणारे अडथळे पार करून स्वतःमधील आत्मविश्वास वाढवावा. अध्यक्षीय भाषणात संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्त्री-पुरूष यांच्यातील भेदभाव कसा व तो ग्रामीण व शहरी भागात कसा निर्माण झाला, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. महिला दिनानिमित्य सर्व स्त्रियांनी आपले अधिकार जाणून घेण्याचे व विविध आव्हानांना सामोरे जाण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन मालोकार यांनी स्त्रियांवर लिहीलेले 'प्रसुतीचा प्रवास' या पुस्तकाचे मान्यवारांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. संचालन प्रा. अर्चना ढोरे यांनी, तर आभार प्रा. प्रियंका तायडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती व संशोधन केंद्रात झालेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेला विद्यापीठातील संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक व विद्यार्थीनी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना कळणार आपल्या मालकीच्या जमिनीची नेमकी हद्द

आता थांबणार वाद | भूमिअभिलेख विभागाने घेतला हा महत्त्वपूर्ण निर्णय

"प्रत्येक सर्व्हे क्रमांकानुसार नकाशा असल्याने त्या गावातील जमीन मालक व जमिनीचे क्षेत्रदेखील निश्चित होऊ शकणार आहे. हे खूप मोठे काम असून, त्याला लवकरच सुरुवात होणार आहे.

किशोर सानप,
उपअधीक्षक,
भूमिअभिलेख कार्यालय, तिवसा

"विभागातून तिवसा तालुक्याची निवड प्रायोगिक तत्त्वावर निवड झाली आहे. यामुळे येथील काम पाहून प्रत्येक तालुक्यात प्रत्येक सर्व्हे क्रमांकाला नकाशाची जोड देण्याचे काम करावे लागेल. यातून आपल्या मालकीच्या जमिनीला नेमकी हद्द काय आहे, हे शेतकऱ्यांना कळू शकणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे वादही थांबतील.

गजानन डोईफोडे,
उपअधीक्षक,
भूमिअभिलेख कार्यालय अचलपूर

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 12) - उताऱ्यानुसार नकाशे उपलब्ध नसल्याने हद्दीचे वाद राज्यात नवीन नाहीत. यामुळे अनेक प्रकरणे न्यायालयात असून, भावकीतही अनेक वाद निर्माण झाले आहेत; मात्र यावर तोडगा काढण्यासाठी भूमिअभिलेख विभागाने प्रत्येक सर्व्हे क्रमांकाला नकाशाची जोड देण्याचे ठरविले आहे. यातून आपल्या मालकीच्या जमिनीला नेमकी हद्द काय आहे, हे शेतकऱ्याला कळू शकणार आहे. पर्यायाने हद्दीवरून होणारे वाद तर टळतीलच तसेच खरेदी-विक्री व बँकांकडून कर्जाची उपलब्धता देखील विनासायास होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील बारा तालुक्यांमध्ये हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार असून यात अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुका आहे. लवकरच त्याला मुहूर्त लागणार आहे. एका सातबारा उताऱ्यात अनेक खातेदार असल्याने त्याचे पोटहिस्से तयार केले जातात. या पोटहिस्स्यांमधील जमीन मालकांना मात्र एकाच सातबारा उताऱ्यावर अवलंबून राहावे लागते. अशा पोट हिस्सेदाराला जमीन विक्री करावयाची असल्यास इतर सर्व खातेदारांची संमती घ्यावी लागते. तसेच एखाद्या हिस्सेदाराला जमीन मोजणी करावयाची असल्यास अन्य सर्व पोट हिस्सेदारांची संमती बंधनकारक असते. खरेदी- विक्रीतही अनेक बंधने येत असल्याने वादही निर्माण होतात. अनेकदा हे वाद न्यायालयातही दाखल होतात. यावर तोडगा काढण्यासाठी भूमिअभिलेख विभागाने राज्यातील बारा तालुक्यांमध्ये प्रत्येक गावातील प्रत्येक सातबाराच्या पोट हिस्स्याची मोजणी आणि त्याच्या नकाशाचे अद्ययावतीकरण करण्याचे ठरविले आहे. यात प्रत्येक सर्व्हे क्रमांकातील क्रमांकाचे सर्वेक्षण होऊन मोजणीनुसार नकाशा तयार केला जाणार आहे. त्यामुळे सातबारा अद्ययावत होऊन नकाशादेखील उपलब्ध होणार आहे. जमीन खरेदी-विक्री प्रकरणांमध्ये सातबारा उताऱ्यानुसार नकाशा असल्याने विनावाद खरेदी विक्री होऊ शकणार आहे. त्याचप्रमाणे अन्य खातेदारांची संमतीची गरज भासत नसल्याने वाददेखील टळणार आहेत. राज्यातील बारा तालुक्यांमध्ये हा प्रयोग राबविला जाणार आहे. एकाच उताऱ्यावर अनेक नावे असणाऱ्या पोटहिस्साधारकांची यामुळे सोय होईल. यासाठी नकाशे महत्त्वाचे पोट हिस्सेदाराला जेव्हा जमीन विक्री करावयाची असते तेव्हा सर्व खातेदारांची संमती आवश्यक असते. एखाद्यास जमीन मोजणी करावयाची असल्यास सर्वांची संमती बंधनकारक असते. खरेदी-विक्रीतही अनेक बंधने येत असल्याने वादही निर्माण होतात, अनेक वाद न्यायालयातही जातात, याला आता आळा बसणार आहे.

मेळघाटात पाच दिवस चालतो होळी उत्सव

आदिवासी बांधव गावात परतू लागले

मेळघाट परिसरातील बाजारपेठ गजबजली

बाजारपेठेत कोट्यावधीची उलाढाल

महासागर प्रतिनिधी

चुरणी, (दि.12)- मेळघाटात सणांच्या राजा म्हणून होळी सणाकडे पाहीले जाते. 12 महिन्यातील सर्व आर्थिक, शारिरिक ताकद हे आदीवासी बांधव या सणाकरिता राखून ठेवतात. कारण हा सण त्यांना दणक्यात साजरा करायचा असतो. गेल्या महिन्याभरापासून बाजारात होळीच्या साहित्याची उलाढाल वाढली आहे. बाजार ग्राहकांनी गजबजून गेला आहे.

मेळघाटातील धारणी व चिखलदरा हे दोन तालुके आदिवासी बहुल आहे. या ठिकाणी आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात राहतात. आदिवासी बांधवांचा सगळ्यात मोठा सण उत्सव हा होळी असून आदिवासी बांधव होळी साजरी करण्यासाठी सहा महिने अगोदरपासूनच होळी साजरी करण्यासाठी आदिवासी बांधव जुळवाजुळ करतात. रोजगाराच्या शोधात मेळघाटातून स्थलांतरित झालेले आदीवासी बांधव पैसे कमावून आता होळीकरिता मेळघाटात परतू लागले आहेत. परत येताना परतवाडा धारणी, चिखलदरा, धारणी या बाजारपेठेतून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. त्यामुळे सध्या बाजारपेठ गजबजले आहेत. या बाजारपेठांमधून कोट्यावधीची उलाढाल होत असते. आदिवासी बांधव कपडे दागदागिने मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. यासह खाण्यापिण्याच्या वस्तू सुद्धा मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.

एकावेळी पेटतात दोन होळ्या

मेळघाटातील प्रत्येक गावांमध्ये हा होळी उत्सव साजरा केला जातो.आदिवासी बांधव दोन होळ्या पेटवितात. एक मोठी होळी, एक लहान होळी अशा दोन होळ्या पेटविल्या जातात. या होळीमध्ये गोवऱ्या, हिरवा बांबू, लाकडांची आहूती दिल्या जाते.

मेळघाटमध्ये ही होळी पाच दिवस चालते. यादरम्यान मोठमोठ्या गावांमध्ये यात्रा उत्सव सुद्धा होतात. मेघनाथ यात्रा म्हणून या यत्रांना संबोधले जाते. या यात्रेमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात उत्सवाची धूम असते. होळी उत्सवामध्ये एक वेगळ्या प्रकारचे चैतन्य व उत्साह असतो. आदिवासी बांधव या उत्सवामध्ये आदिवासी बोली भाषेतील गाण्यांवर फेर धरतात.

अवनीश वेलफेअर फाउंडेशनच्या स्पेशल चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटरचे उद्घाटन

माजी पालकमंत्री आ. प्रवीण पोटे पाटील यांनी पाच वर्षांकरिता स्वीकारले पालकत्व

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.12)- स्थानिक नवसारी रोड येथील रेखा कॉलनी येथे स्थित अवनीश वेलफेअर फाउंडेशनच्या विशेष मुलांच्या डेव्हलपमेंट सेंटरचे लोकार्पण नुकतेच संपन्न झाले. विशेष मुलांच्या या डेव्हलपमेंट सेंटर मध्ये मुलांच्या वैयक्तिक, शैक्षणिक, शारीरिक व बौद्धिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतांचा पुर्ण विकास करणे, त्यांना आपल्यासोबत घेऊन त्यांच्या गरजेनुसार त्यांच्यातील कमी असलेल्या बाबींचा आयुर्वेदिक, ॲलोपॅथीक, होमिओपॅथीक औषधीचा समतोल वापर करुन त्यांना गरजेनुसार वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यांना पूर्ण करणे.

ब्रेन डेव्हलपमेंट आणि शारीरिक डेव्हलपमेंट यासाठी सुसज्ज परिसर आणि विशेष शिक्षक देऊन त्यांच्या कडून ॲक्टिव्हिटी करुन घेणे. या विशेष मुलांना फिजिओथेरपी, आयुर्वेदिक शिरोधारा, हसतखेळत शिक्षण, वेळोवेळी दंत आणि डोळ्यांची चिकित्सा अशा सर्व सोई एकाच जागी निर्माण करणे असे हे डेव्हलपमेंट सेंटर स्थापन करण्यामागील उद्दिष्ट आहे. अशा सर्व प्रकारच्या सोयी एकाच ठिकाणी असलेले अमरावती मधील एकमात्र असणार आहे.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून नामफलकाचे विमोचन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवर आणि उपस्थित विशेष मुलांच्या शुभहस्ते फीत कापून डेव्हलपमेंट सेंटरचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. माजी आमदार बच्चू कडू आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी अत्यंत आत्मीयतेने डेव्हलपमेंट सेंटरचे अवलोकन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. अवनीश वेलफेअर फाउंडेशनचे संचालक योगेश देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि डेव्हलपमेंट सेंटर करण्यामागचा आपला हेतू अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतीने सर्वांसमोर मांडला. विशेष मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये चाहत भराणी हिने %हम होंगे कामयाब एक दिन..% हे गाणे म्हटले, युवांश साहू आणि वशिंका देशमुख हिने अतिशय सुंदर नृत्य सादर केले. विशेष शिक्षिका कांचन दुधे यांनी विशेष मुलांच्या रोजच्या येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. माझी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी अत्यंत भावना स्पर्शी विचार मांडले. डेव्हलपमेंट सेंटर आणि ते सुरू करण्यामागचा उद्देश याची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. येणाऱ्या काळात डेव्हलपमेंट सेंटरला 40 हजार फूट जागा देण्याचे देखील पोटे यांनी आश्वासन दिले. तसेच येणाऱ्या पाच वर्षांकरिता प्रत्येक महिन्याला एक लक्ष रु डेव्हलपमेंट सेंटरला देण्याचे कबूल करून जणू काही येणाऱ्या पाच वर्षांकरिता डेव्हलपमेंट सेंटरचे पालकत्व स्वीकारले. या व्यतिरिक्त प्रत्येक अडचणीमध्ये मी या विशेष मुलांच्या सोबत असुन यापुढे पण काही गरज असल्यास त्या देखील पूर्ण करणार असे आश्वासन पोटे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. समाजामध्ये वावरणारे विशेष गुण हे दुर्लक्षितच असते पण त्यांच्या मध्ये कशाप्रकारे सुधारणा करता येईल याची जबाबदारी अवनीश फाऊंडेशनने घेतली याबद्दल बच्चू कडू यांनी समाधान व्यक्त केले. भविष्यामध्ये डेव्हलपमेंट सेंटरची इमारत बांधायची असल्यास त्याला पूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली. यावेळी मंचावर माजी नगरसेवक प्रशांत डवरे , प्रशांत महल्ले, तिवसाचे माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे तसेच ऋषिकेश देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन क्षिप्रा मानकर तसेच आभार प्रदर्शन वैभव दलाल यांनी केले. आमदार सुलभा खोडके आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते संजय खोडके यांनी सुद्धा डेव्हलपमेंट सेंटरला भेट दिली. या प्रसंगी सचिन राहाटे, मोहित देशमुख, श्याम माहुलकर ,असिफ भाई, उमेश खैरकर, संदीप रेवसकर.गजानन आंडे, विजय खत्री, सीए पियुष लाहोटी, शंतनू हागोने, आदित्य देशमुख, डॉ चेतन गुल्हाने, डॉ कांबळे, डॉ सचिन सोनटक्के , नासिर मुल्ला, प्रशांत तागडे, सुभाष वासनकर, अन्सार शहा, डॉ राजेश गाडबैल, कमलजी खीची, मयुर देशमुख, संदीप देशमुख, राहुल ढोके, मनिष जगताप तसेच परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मोर्शी तहसीलवर मोर्चा

बौद्ध उपासक उपासिकांचा सहभाग

महासागर प्रतिनिधी

मोर्शी,(दि.12) -1949 सालचा टेम्पल ॲक्ट रद्द करून बुद्धगया येथील पवित्र महाबोधी महाविहार ब्राह्मणांपासून मुक्त करण्यात यावे, या मागणीसाठी मोर्शी तहसील कार्यालयावर असंख्य बौद्ध उपासक-उपासिका तसेच आंबेडकरी अनुयायांनी मोर्चा काढला. भदंत डॉ. सत्यानंद महास्थवीर यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

मोर्शी येथील आंबेडकर चौकातील सिद्धार्थ बौद्धविहारापासून या मोर्चाला सुरुवात झाली. जयस्तंभ चौक मार्गे मोर्चाने उपविभागीय कार्यालय येथे धडक दिली. तहसील कार्यालयाच्या आवारात मोर्चाचे जाहीर सभेमध्ये रूपांतर झाले. यावेळी डॉ. सत्यानंद महास्थवीर, अशोक गायकवाड, मनोहर इंगळे, प्रा. दीपक तायडे, अंबादास राऊत, विद्या राजकोरे यांनी सभेला संबोधित केले. महाबोधी महाविहाराचे ब्राह्मणीकरण त्वरित थांबविण्यात यावे, महाबोधी महाविहाराचा एक किलोमीटरचा परिसर ध्वनी प्रदूषण मुक्त करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मागण्या पूर्ण न झाल्यास पुढील काळात रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. सरकार विरोधात नारे देत आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार विनोद वानखडे, उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांना निवेदन सादर केले. मोर्चादरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मोर्चात आंबेडकर राईट युथ वेल्फेअर असोसिएशन, समता सैनिक दल, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, सिद्धार्थ चौक बौद्ध विहार, प्रज्ञा बौद्ध विहार, सुख श्रावस्ती बौद्ध विहार, भीम जागृती मंडळ, बौद्ध विहार फुलेनगर, पंचशील बौद्ध विहार, भारतीय बौद्ध महासभा, त्रिरत्न बौद्ध महासंघ आधी संघटना सहभागी झाल्या होत्या.

सांस्कृतिक कार्यक्रमातून महिला दिन साजरा

एसटी महामंडळाच्या अमरावती विभागाचे आयोजन

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 12) - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागाकडून 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन सांस्कृतिक कार्यकमातून साजरा करण्यात आला. 8 मार्च रोजी सकाळी 11.30 वाजता पंचवटी चौकातील वर्हाडे मंगल कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात आमदार सुभला खोडके, सहा आयुक्त वैशाली पाथरे, एसीबीच्या पोलिस निरीक्षक चित्रा मेसरे, सहायक मोटार वाहन निरीक्षक कांचन जाधव व विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे यांची उपस्थिती होती. या गणमान्य नागरिकांच्या उपस्थितीत उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी विशेष अतिथी म्हणून पल्लवी निलेश बेलसरे, शालिनी अरुण कावरे (फोटोग्राफर), सारिका योगेश ठाकरे (प्राध्यापक), संगीता राजाभाऊ लुंगे (शिक्षिका), श्रद्धा राहुल मोडक (प्राध्यापक), योगिता जिवन वानखडे (माजी खेळाडु - हॉकी), प्रमिला रामदास गायकवाड, काजोल स्वप्निल धनाड (इंजीनिअर) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक सहा आयोजक विभागीय अभियंता वीणादेवी रा. गायकवाड यांच्यासह विभागीय कार्यालय, विभागीय कार्यशाळा व सर्व आगारातील महिला कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

सैनिक कॉलनीवासीयांची नगर परिषदेवर धडक

रस्ता व नालीचे काम पूर्ण करण्याची मागणी

महासागर प्रतिनिधी

दर्यापूर,(दि.12) - आजी-माजी सैनिक आदी नागरिकांचे वास्तव्य असलेल्या दर्यापूर शहरातील सैनिक कॉलनीत अर्धवट अवस्थेत असलेले रस्ता आणि नालीचे बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यात यावे या मागणीसाठी येथील रहिवासी महिलपा-पुरुषांनी नगर परिषदेवर धडक दिली. यावेळी रस्ता आणि नालीच्या कामात केल्या जात असलेल्या दिरंगाईवरुन मुख्याधिकार्यांवर प्रश्नांचा भडीमार करण्यात आला आणि त्यांना धारेवर धरण्यात आले.

सैनिक कॉलनी येथे रस्ता व रस्त्यालगतच्या दोन्ही बाजूच्या नालीसाठी अनेक महिन्यापासून निधी मंजुर झाला आहे. दरम्यान संबंधित ठेकेदाराने नालीचे अर्धवट बांधकाम केले. पुढील नाली बांधकाम मागिल दोन महीन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही बंद अवस्थेत आहे. परिणामी रहीवाशी नागरीकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे संतप्त झालेले सैनिक कॉलनी परिसरातील महीला-पुरुष नागरिक नगरपालिकेवर धडकले. नगरपालिका मुख्याधिकारी नंदू परळकर यांना पाउण तास घेराव घालून त्यांना जाब विचारुन प्रश्नांचा भडीमार केला. तातडीने अर्धवट नाली व नियमाप्रमाणे अतिक्रमण हटवून 50 फुट रस्त्याचे काम सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले. सैनिक कॉलनीत रस्ता आणि नालीच्या कामासाठी निधी मंजूर होवून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. मात्र नंतर नगरपालिका प्रशासन आणि काही लोकप्रतीनिधींच्या हस्तक्षेपामुळेच काम बंद पडल्याच आरोप या रहिवाशांनी केला. मुख्याधिकारी यांनी बांधकाम अभियंता, ठेकेदार पाहणी करून तातडीने काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी प्रदीप मलीये, अशोक काकडे, अनिल टाले, विठ्ठल सगणे, प्रशांत चौधरी, संजय चव्हाण, रावसाहेब होले, नितीन वानखेडे, संजय नागपुरे, राजू डिके, भुषण व्हिल्हेकर, प्रज्ञा तायडे, छाया काळे, ज्योती केवतकर, छाया उंबरकर, छाया राखोडे, कुसूम गायकवाड आदी नागरिक उपस्थित होते.

जगदंब महाविद्यालयात उत्साहात पार पडले स्नेहसंमेलन

सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे आयोजन

महासागर प्रतिनिधी

अचलपूर,(दि.12) - अचलपूर येथील प्रतिष्ठित जगदंब महाविद्यालयात नूकतेच स्नेह संमलनाचे आयोजन करण्यात आले होते. चार दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलनात आयोजित कार्यक्रम व उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. त्यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संगीत खुर्ची, गीत गायन, कवी संमेलन, रांगोळी, मेहंदी, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे तसेच पुष्परचना इत्यादी स्पर्धा पार पडल्या. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन श्री जगदंब विणकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमाकांत शेरकार यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे डॉ. संतोष बनसोड यांनी युवकांची दशा व दिशा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रामीण भागातील आजचा युवक काहीसा दिशा भटकलेला असून अंधश्रद्धेकडे झुकलेला आहे, त्यामधून बाहेर येण्याचा एकच मार्ग ते म्हणजे शिक्षण असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. मोसिम शेख तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अविनाश कोहळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संध्या चर्जन व डॉ. मिलिंद तायडे यांनी करुन दिला. आभार प्रदर्शन डॉ. कुमुदिनी जोगी यांनी केले. विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम उमंग पार पडला. समारोप व बक्षीस वितरण समारंभ संस्थाध्यक्ष रमाकांत शेरकार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून अचलपूर पंचायत समितीचे माजी विस्तार अधिकारी संजय ठाकरे, संस्थेचे सचिव भिमराव दखणे, सदस्य प्रल्हाद शेरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहसंमेलनाचे प्रभारी डॉ. मिलिंद तायडे यांनी तर संचालन डॉ. श्रुती पांडे यांनी केले. डॉ. वैभव पाटील यांनी आभार मानलेत.

गावांच्या जडणघडणीत महिलांचा वाटा मोठा!

खा. अमर काळे यांचे प्रतिपादन ■ कर्तबगार महिलांचा सत्कार सोहळा

महासागर प्रतिनिधी

मोर्शी,(दि.12) - स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के राजकिय आरक्षण आहे. महिलांची जबाबदारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. चुल व मूल यापर्यंत मर्यादित न राहता गावांच्या जडणघडणीत आज महिलांचा सिंहाचा वाटा आहे. अनेक कर्तबगार महिला आज सर्वच क्षेत्रात महत्वाची पदे भूषवित आहेत. महिला कोठेच मागे नाहीत, असे प्रतिपादन वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी केले.

छत्रपती शिवाजी मैत्री संस्था, महाराष्ट्र राज्य तर्फे आयोजित जागतिक महिला दिन सोहळा व कर्तबगार महिलांच्या सत्कार समारंभात अमर काळे बोलत होते. पाळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा कार्यक्रम पार पडला. ज्या सावित्रीबाई फुलेंनी समाजाचा विरोध पत्करून शिक्षणाची दारे उघडी करून दिली, त्यांना विसरू नका. आज त्यांच्यामुळे प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगती करित आहे. कुटुंबाची जबाबदारी पार पाडून केवळ फक्त आईच आपल्या मुलाबाळांना चांगले संस्कार देऊ शकते. आजही मोठ्या प्रमाणात भ्रूणहत्या सुरू असून यावर महिलांनी मात करणे गरजेचे आहे, असेही अमर काळे यावेळी बोलताना म्हणाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संजय पांडव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान खासदार अमर काळे यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सरपंच वर्षा घोरमाडे, पोलीस पाटील सागर साठे, माजी सरपंच अजय राऊत, भूषण कोकाटे, पंकज विधळे, चक्रधर निस्वादे, हिरुसिंग मोहने, बाळू मधापुरे, नामदेव इंगळे, ओंकार साठे, चंपतराव नेवारे, अमर गुडधे, प्रशांत राणे, सागर भातुरकर, पत्रकार अजय पाटील, पुष्पाताई परतेती, शितल तिडके, कांचन राऊत, चंदा घोरपडे, स्वाती मानकर, माधुरी राऊत, प्रज्ञा सिरसाट, सुषमा ठाकरे उपस्थित होते. यावेळी पाळा येथील नेहा खान हिची कोतवालपदी निवड झाल्याबद्दल तिचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. माऊली बचत गट, कृष्णाई बचत गट, तेजस्विनी समूहातील महिलांना खासदार अमर काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी श्रीनिधी थोरात, संध्या कोहळे, ज्योत्स्ना उईके, संजय पांडव यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रणीत राऊत तर संचालन सौरभ कुकडे व ऋतिक राऊत यांनी केले. आभार प्रदर्शन अमोल निस्वादे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी मैत्री संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रनित राऊत, अभिजीत मोहने, नितेश गोडबोले, सुभाष पुसाम, रोशन अंकुलनेरकर, श्रीजीत नेहारे, नितीन गुडधे, दर्शन गुडघे, कमलेश कडू, राहुल कुकडे, ऋतिक राऊत, सागर राऊत, वेदांत ठाकरे, मयूर राऊत, रमण मधापुरे, मयूर धावडे, कृणाल सीरसाट, पंकज राऊत, शुभम चिंचोळकर, आशिष आमले यांनी परिश्रम घेतले.

शाळांना त्यांच्या सोयीने परीक्षा घेऊ द्याव्यात

राज्य शिक्षक सेनेची मागणी | शिक्षण उपसंचालकांना निवेदन

महासागर प्रतिनिधी

अंजनगाव बारी,(दि.12) - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदच्या संचालकांनी शाळांनी 25 एप्रिलपर्यंत परीक्षा आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. मुख्याध्यापक व शिक्षकांनी त्याबद्दल नाराजी व्यक्त केली असून शाळांना त्यांच्या सोयीनुसार परिक्षा घेउ द्याव्यात अशी मागणी केली आहे. यासंदर्भात शिक्षण उपसंचालकांना महाराष्ट्र शिक्षक सेनेने एक निवेदन सादर केले आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेचे संचालक राहूल रेखावार यांना पत्र लिहून परिक्षा घेण्यासंदर्भातील अडचणी लक्षात आणून दिल्या आहेत. आरटीई कायद्यातील तरतूदी नुसार इयत्ता 1 ते 8 वी व इयत्ता 6 ते 8 वी च्या अध्यापनाला लागणारे घड्याळी तास, एसएसकोड मधील मुख्याध्यापकांचे कर्तव्य-शाळा प्रवेश, परीक्षा व निकाल यांची जबाबदारी व नियोजन यात अचानक बदल केल्यास विद्यार्थी, पालक व शाळा अडचणीत येऊ शकतात. तसेच राज्यातील अनुदानित शाळा व जिल्हा परिषद शाळांची छते टिन पर्त्याची आहेत, पंखे व वीज नाही, अनेक किलोमीटर अंतर विद्यार्थी शाळेत पायी चालत येतात. विदर्भ व राज्यातील मार्च-एप्रिल महिन्यातील प्रतिकूल हवामानाचा विचार करता 10 एप्रिल पर्यंत शाळांना त्यांच्या सोयीने परीक्षा घेऊ द्याव्यात, अशी विनंती त्यांनी केली आहे. यासंदर्भात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनाही अभ्यंकर यांनी भेटून पत्र दिले. अमरावती येथे शिक्षण उपसंचालक कार्यालयात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, खाजगी विभाग अमरावतीचे अध्यक्ष रुपेश टाले यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी दिपक यावले, श्रीकांत देशमुख उपस्थित होते.